# प्रकरण पाचवे

# उ प सं हा र

## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

गो.ग. आगरकर व लो. टिळक यांच्या पूर्वी महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेची चळवळ सुरु झाली होती. अंधश्रध्दा आणि सामाजिक विषमता यांचा समाजावर अनिष्ठ परिणाम झाला होता. स्त्रियांना समाजात मानाचे स्थान नव्हते. त्यांना दुय्यम स्थान दिले होते. अशा मागास समाजाला जागे करण्याचे काम त्या काळात अनेक समाज सुधारकांनी केले. यामध्ये प्रामुख्याने आगरकरांना अग्रस्थान द्यावे लागते. १९व्या शतकात स्त्रीयांच्या संदर्भात जे प्रश्न निर्माण झाले त्यामध्ये बालविवाह निराकरण, स्त्रीशिक्षण, स्वयंवर, पुनर्विवाह, घटस्फोट, केशवपन, सासुरवासाचे उच्चाटन इ. समावेश होतो. स्त्रियांचा सामाजिक दर्जा धर्मावर आधारीत असल्यामुळे तो अतिशय खालावलेला होता. स्त्रियांवर धर्माच्या नावावर अन्याय होत होता. त्यांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक, सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य नव्हते. वेगवेगळ्या रुढी परंपरांच्या माध्यमातून जन्मापासूनच स्त्रियांचे शोषण केले जात होते आणि या शोषणातूनच अनेक स्त्रीप्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. अशावेळी आगरकरांनी मात्र स्पष्ट बुध्दिवादी भूमिका घेऊन स्त्रीला माणूस म्हणून जगता आले पाहिजे, पुरुषाची उपभोग्य वस्तू असा तिचा विचार करुन चालणार नाही असे प्रतिपादन केले. भावी समाजरचनेत स्त्री स्वातंत्र्याला वाव द्यावा असे आवर्जून मत मांडणाऱ्या आगरकरांची विचारसरणी मुलभूत स्वरुपाची होती. बालविवाह, स्वयंवर, संमतीवयाचा प्रश्न, विषमविवाह, संतती नियमन, विधवा विवाह, घटस्फोट या स्त्रियांच्या समस्यांवर त्यांनी तळमळीने लिहिले. स्त्रियांच्या पोषाखापासून ते स्त्री-पुरुष समानतेच्या प्रश्नापर्यंत त्यांनी विचार मांडले.

हिंदू स्त्रीचे मनच शतकानुशतकाच्या अंधश्रध्देच्या बेडया तोडून मोकळे होणे ही काळाची गरज होती असे त्यांचे मत होते. रूढिग्रस्त समाजामध्ये स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा होणे अशक्य आहे. म्हणून जबाबदार लोकांनी परकीय सरकारकडे कायद्याची मागणी करणे योग्यच आहे असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. सामाजिक बाबतीत सरकारने हस्तक्षेप करावा की करू नये येथेच आगरकर व टिळक यांच्यात मतभेद निर्माण झाले. १८८४ ते १८८९ पर्यंत त्यांनी एकत्रित कार्य केलेले दिसून येते. परंतु त्यानंतर संमती-वयाच्या मसुदाबद्दल दोघांच्यात मतभेद निर्माण झाले. पुढे आगरकरांनी सामाजिक सुधारणेला तर टिळकांनी राजकीय सुधारणेला प्रथम पसंती दिल्यामुळे त्यांच्यामधील मतभेदाचे स्वरूप अधिक व्यापक होत गेले. या मत-भेदाचा व स्त्रीप्रश्न विषयक दृष्टीकोनाचा अभ्यास या प्रबंधातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

"गोपाळ गणेश आगरकर व लो. टिळक यांच्या स्त्रीप्रश्न विषयक भूमिकेची तुलना" या शोध निबंधात पहिल्या प्रकरणामध्ये आगरकर व टिळक यांच्या काळातील तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थिती व त्या परिस्थितीचा त्यांच्यावर झालेला परिणाम जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. टिळकांवर धार्मिक विचारांचा प्रभाव होता तर आगरकरांवर आधुनिक पाश्चिमात्य विचारवंत मिल, स्पेन्सर, गिबन यांचा प्रभाव होता.

१९व्या शतकात स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा नव्हती. स्त्री-पुरूषांना समान अधिकार नव्हते. जातिभेद, अस्पृश्यता, मोठया प्रमाणावर होती. सतीची चाल, बालविवाह, विधवाविवाह बंदी, केशवपन स्त्री शिक्षणाला विरोध अशा अनिष्ठ प्रथा समाजामध्ये रूढ होत्या. वरील सर्व प्रथांचे मूळ कारण बालविवाह हे होते. म्हणून दुसऱ्या प्रकरणामध्ये बालविवाह व

संमतीवयाची चळवळ याची चर्चा केलेली आहे. बालविवाहाची चाल हे स्त्रियांच्या दुर्दशेचे प्रमुख कारण होते. हिंदू समाजात पूर्वी तरुणपणी विवाह होत होते. परंतु पुढे ही पध्दत बंद होऊन बालविवाह सुरु झाले. मुले जन्माला येण्यापूर्वीच त्यांचे विवाह होऊ लागले. त्यामुळे निर्माण होणारी पिढी अशक्त व अल्पायुषी झाली. लहान वयात लग्न झाल्यामुळे स्त्रियांना शिक्षणापासून वंचित रहावे लागले. बाल-विवाहाच्या रुढीमुळेच स्त्रियांना बालवैधव्य, विषमविवाह व केशवपन या अत्यंत क्रूर रुढींना तोंड द्यावे लागले. म्हणून आगरकरांनी बालविवाहाचा निषेध केला आहे. बालविवाह ही इतर चालीपेक्षा वाईट आहे असे त्यांचे मत होते. "सामाजिक सुधारणा आणि कायदा" या लेखात आगरकरांनी बालविवाहाच्या रुढीवर व तिचे समर्थन करणाऱ्यांवर अत्यंत प्रखर टीका केली आहे आणि ही रुढी कायद्यानेच बंद केली पाहिजे असा आग्रह केला आहे. परंतु टिळकांच्या मते बालविवाहाच्या रुढीबद्दल स्वत: लोकांनीच आपल्या शिरावर जबाबदारी घ्यावी. परकीय सरकारच्या मदतीने ते बंद करु नयेत यामधूनच संमतीवयाची चळवळ सुरु झाल्याचे दिसून येते. पुढे १८८४ साली संमतीवयाच्या कायद्याचा मसुदा हिंदुस्थान सरकारच्या पुढे आला तेंव्हा हा वाद निर्माण झाला. त्यात बारा वर्षांच्या लग्न झालेल्या मुलीशी संभोग झाला तर नवऱ्याला देखील कायद्याने शिक्षा व्हावी हा प्रमुख मुद्दा होता व या मुद्यातूनच मोठा वाद निर्माण झाला. या बिलाला लोकमान्य टिळक व रमेशचंद्र मित्र यांनी विरोध केला. तर आगरकरांनी याचे अत्यंत निर्भयपणे समर्थन केले. टिळकांच्या मते अशा प्रकारे कायदा करणे म्हणजे आमच्या धर्मात हात घातल्यासारखे आहे. यावरुन त्यांच्यावर धर्माचा खोलवर परिणाम झालेला दिसून येतो. बाल-विवाह व संमतीवय यांचा परस्पर संबंध असल्यामुळे हे दोन्ही प्रश्न एकत्रित चर्चिले आहेत.

तिस-या प्रकरणामध्ये स्त्रीशिक्षणाविषयी आगरकर व टिळक यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांचे विवाह लहानपणीच होत असल्यामुळे त्यांना शिक्षण घेता येत नव्हते. बालविवाह, सती, विषम विवाह, केशवपन यामुळे समाजस्थिती बिघडली होती. स्त्रियांची जर उन्नती करायची असेल तर त्यांच्यावरील रूढीचा व धार्मिक संस्काराचा पगडा दूर करून त्यांना शिक्षणाची संधी दिली पाहिजे असे आगरकरांचे मत होते. आगरकरांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. परंतु टिळकांनी स्त्रियांचे शिक्षण देशी भाषेत व्हावे, त्यात धर्माचा समावेश असावा, ते कुटुंब व्यवस्थेस अनुसरून असावे, स्त्रियांचे शिक्षण पुरुषांसारखे असू नये अशा प्रकारचे मत व्यक्त केले आहे. याउलट आगरकरांनी मुलींना सक्तीचे शिक्षण, समान व एकत्रित शिक्षण यांचा पुरस्कार केलेला आहे. यावरून असे स्पष्ट होते की, स्त्री शिक्षण लैंगिक श्रमाच्या आधारावर यावे असा टिळकांचा आग्रह होता. त्यामुळे पारंपारिक लैंगिक विषमतेचा पाया समाजात बळकट होत गेला. याउलट आगरकरांच्या मते स्त्री-पुरुषांना समान दर्जा मिळवण्याचा प्रयत्न शिक्षणाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे असे होते.

चौथ्या प्रकरणामध्ये आगरकर व टिळक यांच्या इतर स्त्री प्रश्नांवरील विचारांचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने स्वयंवर, पुनर्विवाह, घटस्फोट, केशवपन आणि शारदासदन यासंबंधी त्यांच्यामधील मतभेद दिसून येतात. आगरकरांनी स्वयंवर पध्दतीचा स्वीकार केला होता. जे स्वयंवर नाहीत ते बालविवाहच होय असे त्यांचे मत होते. बालविवाहाचे खंडन म्हणजे स्वयंवराचे मंडन असे आगरकरांचे स्पष्ट मत होते. जी स्वयंवरे नाहीत ते बालविवाहच आहेत. ज्याचे त्याने लग्न करणे म्हणजे स्वयंवर होय. लोकमान्य टिळकांनी मात्र स्वयंवर पध्दतीला विरोध केलेला दिसून येतो. त्यांच्या मते प्रीतीविवाहाची चाल जर आम्ही सुरू केली तर आमच्यातील

नीती लोप होईल व तिला सासरचा पाठिंबा मिळणे कठीण होईल. थोडक्यात स्वयंवरामुळे आम्हाला लाभ न होता उलट आमचे नुकसानच होणार आहे. आगरकरांनी मात्र स्वयंवर पध्दतीचा पुरस्कार करुन एकाअर्थी संमतीवयाच्या चळवळीला पाठिंबा दिलेला दिसून येतो. कारण बालविवाह झाल्यामुळे त्यातून पुढे ब-याचदा वैधव्याचा प्रश्न निर्माण होत होता आणि अशा विधवांच्या पुनर्विवाहास आगरकरांनी पाठिंबा दिला. असंमत वैधव्य, पुनर्विवाहबंदी ही रुढी आगरकरांना बालविवाहा-इतकीच घातक वाटत होती. परंतु यासंबंधी आगरकरांनी स्वतंत्र व विस्तृत विवेचन केलेले आढळत नाही. पण विष्णुशास्त्री पंडित यांनी या बाबतीत जे प्रयत्न केले त्याचा आगरकरांनी गौरव केलेला दिसून येतो. आगरकरांच्या मते बालविवाह जितका निशिध्द आहे तितकीच पुनर्विवाह बंदी निशिध्द आहे. परंतु टिळकांनी पुनर्विवाहाला स्पष्टपणे विरोध केलेला दिसून येतो. त्यांच्यामते समाजाला दुखावता कामा नये. पुनर्विवाह करणा-या व्यक्तींनी आई-बापांना दुखवून ही सुधारणा घडवून आणण्यात मतलब नाही. परंतु काही मातापित्यांची आपल्या मुलीचा पुनर्विवाह करण्याची इच्छा असेल तर त्याबद्दल टिळकांनी कोणत्याही प्रकारची मते व्यक्त केलेली आढळत नाहीत. त्यांनी पुरुषांच्या बाबतीत ४० पर्यंत पुनर्विवाह करण्यास संमती दिली आहे व ४० नंतर एखाद्या पुरुषाला लग्न करायचे असेल तर ते विधवेशी करावे असे त्यांचे मत होते. येथे टिळकांचा पुनर्विवाहासंबंधी विचारात विसंगती आढळते. कारण स्त्री पुनर्विवाहाला विरोध करताना दुसरीकडे ४० नंतर पुरुषांनी विधवेशीच पुनर्विवाह करावा असे मत मांडले आहे.

बालविवाहामधून निर्माण झालेला आणखी एक प्रश्न म्हणजे घटस्फोट होय. दादाजी-रखमाबाई प्रकरणावरुन आगरकर व टिळकांचे घटस्फोटासंबंधीचे विचार स्पष्ट होतात. रखमाबाईचा विवाह बालपणी

दादाजीबरोबर झाला. परंतु रखमाबाईस कळू लागल्यानंतर तिने दादाजीचा नवरा म्हणून स्वीकार करण्यास नकार दिला. त्यावेळी दादाजीची बाजू सनातन्यांनी (टिळक पक्षाने) घेतली तर रखमाबाईची बाजू सुधारकांनी (आगरकरांनी) घेतली. आगरकरांनी रखमाबाईस दादाजीपासून फारकत घेण्यास मान्यता दिली होती. परंतु टिळकांच्या-मते एखाद्या स्त्रीने आपला पती आपणास आवडत नाही किंवा योग्य नाही म्हणून आपणास काडीमोडकरावी कोर्टात फिर्याद आणावी ही आश्चर्याची गोष्ट आहे. या प्रकरणात आगरकरांचे मत असे होते की, व्यक्ती स्वातंत्र्य तत्वाच्या आधारे विवाह नामंजूर करण्याचा अधिकार रखमाबाईस आहे म्हणून या प्रकरणात रखमाबाईची बाजू आगरकरांनी घेतलेली दिसून येते.

वैधव्यातून निर्माण झालेला व स्त्रीयांचा समाजातील दर्जा खालवण्याचे आणखी एक कारण म्हणजे केशवपन होय. टिळकांनी केशवपनाच्या चालीचे समर्थन केले आहे. त्यांच्या मते जर विधवेचे वपन केले नाही तर तिला शुध्दी येणार नाही. समाजात जर सकेशा विधवा राहिली तर तिचे हाल कुत्राही खाणार नाही. थोडक्यात केशवपनाची चाल कायद्याने व अन्य मार्गाने बंद करण्यास टिळक अनुकूल नव्हते. त्यापेक्षा सतीची चाल चांगली असे त्यांचे मत होते. म्हणजेच लो. टिळकांनी सतीच्या चालीचे समर्थन केले आहे. आगरकरांनी मात्र ही चाल कायद्याद्वारे सोडवावी असा आग्रह करुन केशवपनाच्या चालीला प्रखर विरोध केला.

चौथ्या प्रकरणाच्या शेवटी शारदासदनाचा संदर्भ घेतला आहे. "शारदा सदना"च्या घटनेमधून एकूण स्त्री शोषणाविषयी टिळक व आगरकर यांचे मत स्पष्ट होते. १८८२ साली रमाबाईंनी स्त्री समाजाची उन्नती होण्यासाठी "आर्य समाजाची" स्थापना केली. परंतु तेथे स्त्रियांना

ख्रिश्चन धर्माची शिकवण दिली जात होती. याला टिळकांनी प्रथमपासून विरोध केला. तर आगरकरांनी रमाबाईंना पाठिंबा दिला. परंतु वस्तुस्थिती कळाल्यानंतर आगरकरांनी सदनाचा पक्ष घेणे अवघड आहे असे स्पष्ट केले. रखमाबाई संदर्भात टिळकांनी एकूण स्त्री जातीबद्दल जी मते दिली आहेत ती लक्षात घेण्यासारखी आहेत. त्यांच्या मते एका स्त्रीने महाराष्ट्रात येवून आमच्या शहाण्यासुर्त्या लोकांच्या डोक्यावर हात फिरवावा ही मोठया दु:खाची व आश्चर्याची गोष्ट आहे. परंतु स्त्रीया काय करणार नाहीत ? एका कवीने स्त्रियांचे स्वाभाविक दोष वर्णन केले आहेत. त्यात किंचित फरक केला असता ते वर्णन प्रकृत स्थळी आदी लागू पडते ते असे, "साहसमनृतं माया विद्वत्व विवेकिता । अशौचत्व निर्दयत्वं स्त्रीणां दोषा: स्वभावत:" यावरुन टिळकांचा दृष्टिकोन परंपरानिष्ठ होता. "शारदासदनासंबंधी" आगरकरांचा दृष्टीकोन असा होता की धर्माच्या अंतर्गतच स्त्री विषयक सुधारणा झाली पाहिजे. धर्मांतर त्यांना मान्य नव्हते. यावरुन टिळक व आगरकरांचा स्त्री व स्त्रीप्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट होतो.

एकूण आपल्या अभ्यासातून आपण असे निष्कर्ष काढू शकतो की, इहवादी किंवा धर्मनिरपेक्ष समाजसुधारणा टिळकांना पसंत नव्हती. आगरकरांनी मात्र हिंदूधर्मातील विसंगती, विरोध, असंबध्दता दाखविलेली आहे. त्यामुळे टिळक आणि आगरकर यांचे मतभेद इहवादी सुधारणा इष्ट की धर्मनिष्ठ सुधारणा इष्ट याबद्दलचा होता. टिळकांचे सामाजिक विचार धर्मरक्षणाच्या, धर्मपुनस्थापनेच्या संकल्पनेने प्रभावित झालेला होता. टिळकांचे व्यक्तित्व वेदांती होते. टिळकांच्या मते भारताचे राष्ट्रीय वैशिष्टय धर्मविचारात आहे आणि भारताचे सांस्कृतिक ऐक्य धर्मामुळेच कायम राहिलेले आहे. ज्यामुळे राष्ट्रीय ऐक्याशी ते अत्यंत निगडीत आहे.

धर्माला धोका पोहचविणारी सामाजिक चळवळ त्यांना पसंत नव्हती. आगरकरांनी सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून स्त्रीप्रश्न सोडविण्याचा जो प्रयत्न केला त्यामध्ये त्यांनी हिंदूधर्मातील दोष दाखवून विसंगतीलाच विरोध केला. आगरकरांनी शारदासदनाच्या अंतर्गत येणाऱ्या धर्मांतराच्या प्रश्नाला विरोध करून आपली भूमिका स्पष्ट केली. थोडक्यात टिळक आणि आगरकर यांच्या समाजसुधारणेसंबंधित तुलनात्मक अभ्यास करीत असताना आगरकरांनी स्त्री सुधारणेला पूर्ण पाठिंबा दिल्याचे दिसून येते. यामधूनच सामाजिक स्वातंत्र्य आधी की राजकीय स्वातंत्र्य आधी या विषयी दोघांमध्ये मतभेद निर्माण झालेले दिसून येतात. तत्कालिन सामाजिक परिस्थिती पाहता समाजावर धर्माचा पगडा जबरदस्त असल्यामुळे व पुरुष प्रधान संस्कृती अस्तित्वात असल्यामुळे समाजाने आगरकरांच्या सामाजिक सुधारणांना दुय्यम स्थान देऊन टिळकांच्या राजकीय विचारांना महत्व दिल्यामुळे त्यांना लोकमान्यता मिळाली. थोडक्यात टिळकांना राजमान्यता मिळाली. पण आगरकरांच्या समाजसुधारणेला लोकांकडून हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. पण आगरकरांचे हे विचार त्यावेळीही महत्वाचे होते आणि म्हणून आजही तितकेच महत्वाचे आहेत. आजही स्त्रियांकडे पाहण्याची बहुसंख्य पुरुषांची दृष्टी पूर्वीपेक्षा फारशी बदललेली नाही. एकीकडे स्त्रीला देवता मानायचे आणि दुसरीकडे बालविवाह, हुंडाबळी, सती आणि परितक्त्या स्त्रियांचे शोषण करायचे हा दांभिकपणा आजही आपल्या समाजात दिसून येतो. अशावेळी आगरकरांनी मांडलेल्या विचारांचा विचार करून तो आचरणात आणणे आवश्यक आहे.

......